# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (पी एम एस एम ए )

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मागील काही वर्षामध्ये राज्याने ग्रामीण भागातील माता व बालकांना देण्यात येणा-या आरोग्य सेवामध्ये बरीच सुधारणा केलेली आहे व त्यामुळे राज्याच्या माता मृत्यूच्या प्रमाणात बरीच घट होण्यास मदत झालेली आहे. माता मृत्यू कमी करण्यामध्ये महाररष्ट्र राज्या देशात दुस-या क्रमांकावर आहे, परंतु राज्यात अजुनही बरेचशे माता मृत्यू टाळता येवु शकतात. सुरक्षित मातृत्व' हे मातृत्व आरोग्य सुधारण्याचे व माता मृत्यू कमी करण्याचे एक प्रभावी साधन आहे.

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाचे आयोजन दर महिन्याच्या ९ तारखेला व ९ तारखेला रविवार किंवा सुट्टी असेल तर त्यापुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी राबविण्यात यावे. जिल्हा स्तरावर सदर अभियान प्रभाविपणे राबविण्यसाठी जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन व कार्यकारी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी यांची नोडल ऑफिसर म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. सदर अभियानास संस्थास्तरावर प्रसिध्दी यावी.

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियाना अंतर्गत दुस-या आणि तिस-या तिमाहितील गरोदर मातांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून दयावयाच्या आहेत. प्रयोगशाळा चाचण्या, सोनोग्राफी तपासणी, तज्ञांद्वारे आरोग्य तपासणी, अतिजोखमीच्या मातांचे निदान व योग्य संस्थांमध्ये संदर्भ सेवा है या अभियानाचे प्रमुख घटक आहेत. हे अभियान कार्यक्षेत्रातील शासकिय संस्थांमध्ये राबविण्यात यावे.

गरोदर मातांना या अभियाना अंतर्गत केंद्र शासनाच्या निकषानुसार दर्जेदार सेवा देण्यासाठी जास्तीत जास्त संस्थांची निवड करावयाची आहे. संस्थांची निवड करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनास पुढील प्रमाणे

## योजने अंतर्गत संस्था निवडीसाठी महत्वाचे निकष

• केंद्र शासनाच्या सुधारित निकषा प्रमाणे तज्ञ मनुष्य बळ प्रयोग शाळा चाचण्या व सोनाग्राफी तपासणी असलेल्या संस्थेत निकषाप्रमाणे सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

| तज्ञ मनुष्य बळ | प्रयोग शाळा चाचण्या | आवश्यक तपासण्या |
|---|---|---|
| Obsetrician/CemoC trained emo/Physician | HB | |
| | Blood sugar | |
| Sonologist | Urin – for alb Sugar | Sonography |
| | HIV | |
| | VDRL | |